सकाळ
मुंबई, बुधवार, ७ डिसेंबर २०१६
९

'बीएसएनएल'चा १४९ रुपयांचा प्लान

नवी दिल्ली : भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) ग्राहकांना लवकरच १४९ रुपयांमध्ये महिनाभर अनलिमिटेड लोकल व एसटीडी कॉलचा आनंद घेता येणार आहे. नवीन मासिक टॅरिफ प्लान नव्या वर्षाच्या सुरुवातीला सुरू केला जाणार आहे. या योजनेमुळे बीएसएनएल जिओला टक्कर देण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे. बीएसएनएलच्या १४९ रुपयांच्या ऑफरमध्ये अनलिमिटेड कॉलसह ३०० एमबी डेटाही उपलब्ध होणार असल्याचे बीएसएनएलचे प्रमुख अनुपम श्रीवास्तव यांनी सांगितले. 'जिओ'ची वेलकम ऑफर ५ सप्टेंबर २०१६ ला सुरू झाली असून, नवीन घोषणेनुसार ती ३१ मार्च २०१७ पर्यंत सुरू राहणार आहे.

गुजरातेत कामगारांची तीन लाख बँक खाती

सकाळ न्यूज नेटवर्क

अहमदाबाद, ता. ६ : कामगारांनी खाती उघडावीत म्हणून गुजरातमधील बँकांनी प्रयत्न सुरू केले असून, आतापर्यंत तीन लाख खाती उघडण्यात आली आहेत. कामगारांना बँक खात्याची माहिती देण्यासाठी ५८०० प्रशिक्षण वर्ग घेण्यात आल्याची माहिती 'स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी'चे (एसएलबीसी) निमंत्रक विक्रमादित्यसिंह खिची यांनी दिली.

बँकेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक कारखानेमालकांनी कामगारांचा पगार या नव्या खात्यांत जमा केला आहे. नरोडा, वटवा आणि ओढाव या तीन औद्योगिक वसाहतींमध्ये १० हजार बँक खाती उघडली गेली आहेत. भावनगर जिल्ह्यातील शिहोर शहरात सुमारे दोनशे कारखाने असून, त्यात तीन हजार कामगार काम करतात. त्यातील फक्त पन्नास टक्के कामगारांची बँकेत खाती होती. आता आणखी दोनशे कामगारांनी खाती सुरू केली असल्याची माहिती दिली.

नोटाबंदीनंतर जन धन योजनेअंतर्गत असलेल्या खात्यांत भरीव रक्कम जमा झाली आहे. 'पीएमजेडीवाय'च्या संकेतस्थळानुसार, नोव्हेंबर ३० अखेर या खात्यांत ३६४९.२१ कोटी होते. २४ ऑगस्टपर्यंत या खात्यांत १५४२.७७ कोटींची रक्कम होती. भारतीय अधिकाऱ्यांवरही निर्बंध लादण्यात येतील, असे पत्रात म्हटले आहे.

व्याजदर कपातीकडे लक्ष

रिझर्व्ह बँकेचा आज पतधोरण आढावा

पतधोरण समितीसमोरील आव्हाने

- नोटाबंदीनंतर ग्राहकांच्या क्रयशक्तीवर झालेला परिणाम
- नोटाबंदीत बँकांमध्ये जमा झालेली कोटयवधींची राशी
- चलन बाजारात रुपयाचे होणारे अवमूल्यन
- औद्योगिक उत्पादनावर मंदीचा प्रभाव कायम

मुंबई, ता. ६ (वृत्तसंस्था) : काळा पैसा रोखण्यासाठी जुन्या पाचशे आणि हजाराच्या नोटा बंद करण्याच्या मोहिमेत बँकिंग यंत्रणेत जवळपास नऊ लाख कोटी आले आहेत. बँकांची रोकडची चणचण दूर झाली आहे. त्याचबरोबर महागाई नियंत्रणात असल्याने बुधवारी (ता.७) जाहीर होणाऱ्या पतधोरणात व्याजदर कपात दृष्टिपथात असल्याचे बोलले जात आहे. नोटाबंदीने हैराण झालेल्या जनतेला व्याजदर कमी करून कर्जाचा भार हलका करण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँक करेल, असा अंदाज आहे.

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची मंगळवारी (ता.६) गव्हर्नर डॉ. ऊर्जित पटेल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. पतधोरण समिती सध्या सुरू असलेल्या नोटाबंदीनंतर उद्भवलेल्या स्थितीचा गांभीर्याने विचार करावा लागेल. जुन्या पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून रद्द केल्याने ग्राहकांच्या क्रयशक्तीवर मोठा परिणाम झाला आहे. यामुळे गुंतवणुकीवरही परिणाम होण्याची भीती आहे. नोटाबंदीच्या सुरुवातीच्या दोन आठवड्यांत ग्रामीण उलाढालीत कमालीची घट झाल्याने विकासाचा वेग संथ होण्याची शक्यता विविध संस्थांकडून व्यक्त केली जात आहे. याशिवाय चलन बाजारात रुपयातील अवमूल्यन आरबीआयची चिंता वाढवणारे आहे. रुपयाचा स्थिर करण्यासाठी बँकेला ठोस उपाययोजना कराव्या लागतील. दरम्यान, नोटाबंदीने जमा झालेल्या रोकडचाही प्रश्न आरबीआयला सतावत आहे. यावर उपाय म्हणून व्याजदर स्थिर ठेवले जातील, अशीही शक्यता काही जाणकारांनी व्यक्त केली आहे.

पटेल यांनी पहिल्या पतधोरणात रेपोदर पाव टक्क्याने कमी केला होता. सध्या रेपोदर ६.२५ टक्के आहे. रिझर्व्ह बँकेने जानेवारी २०१५ पासून रेपोदर १.७५ टक्क्यांनी कमी केला आहे. मात्र, या तुलनेत गृहकर्जासह इतर कर्जांचे दर अद्याप जास्तच आहेत. नोटाबंदीनंतर रिझर्व्ह बँकेचे पहिलेच पतधोरण आहे. 'व्याजदराचा निर्णय पतधोरण समिती घेणार असल्याने दरकपातीचा अंदाज बांधणे कठीण आहे. पाव टक्का किंवा अर्धा टक्क्याने दर कमी करण्यास पूरक वातावरण आहे, असे एसबीआयचे व्यवस्थापकीय संचालक रजनीश कुमार यांनी सांगितले.

दहशतवादाविरोधात तंत्रज्ञान क्षेत्राची एकजूट

ट्विटर, यू ट्यूबकडून डेटाबेसची तयारी

वॉशिंग्टन, ता. ६ (पीटीआय) : इंटरनेटवरून दहशतवादाविषयी मजकुराचा प्रसार रोखण्यासाठी जगभरातील सत्तांकडून दबाव येऊ लागल्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांनी यासाठी एकत्र पाऊल उचलले आहे.

ट्विटर, मायक्रोसॉफ्ट आणि यू ट्यूब या कंपन्यांनी माहितीची देवाणघेवाण आणि दहशतवाद पसरविणारा मजकूर तसेच व्हिडिओ काढून टाकणे व त्यांच्या स्रोतांचा शोध घेण्यासाठी एकत्र काम करण्याची तयारी दर्शविली आहे. यासाठी या कंपन्या एकत्रित डेटाबेस तयार करणार आहेत. या डेटाबेसमध्ये डिजिटल फिंगरप्रिंट, छायाचित्रे आणि व्हिडीओ असतील. यामुळे कंपन्यांना दहशतवादाचा प्रसार करणारा मजकूर शोधणे सोपे होणार आहे. दहशतवादी संघटनांचा इंटरनेटवर पसरणारा मजकूर रोखण्याचे आव्हान मागील काही काळापासून तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांपुढे आहे.

इस्लामिक स्टेट (इसिस) या दहशतवादी संघटनेच्या समर्थकांनी सोशल मीडियाचा वापर विचारमरणीचा प्रसार आणि तरुणांना आपल्याकडे वळवण्यासाठी केल्याचे दिसून आले आहे. आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या प्रमुखांची अमेरिकी अधिकाऱ्यांसोबत जानेवारीत बैठक झाली होती. यात दहशतवाद्यांकडून सोशल मीडियाच्या वापराविषयी चर्चा झाली होती.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य विरुद्ध दहशतवाद

अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपणे आणि बेकायदा कारवाया व पायरसीला प्रतिबंध करणे यातील संतुलन राखण्याचे आव्हान तंत्रज्ञान कंपन्यांसमोर आहे. तसेच, दहशतवादी मजकूर म्हणजे काय, याचीही व्याख्या त्यांना वारंवार ठरवावी लागत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होऊ नये, म्हणूनही कंपन्यांना दक्ष राहावे लागत आहे.

गुंतवणूकदारांत उत्साह

सेन्सेक्समध्ये ४४ अंशांची वाढ; रुपयाही वधारला

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ६ : जुन्या नोटा रद्द करण्याच्या निर्णयानंतर बँकांत मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा झाली आहे. रक्कम सुलभतेच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेकडून घेतल्या जाणाऱ्या पतधोरण आढावा बैठकीत बुधवारी व्याजदर कपातीची शक्यता वाढली आहे. शेअर बाजारात त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. व्याजदर कमी होण्याच्या शक्यतेने मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स मंगळवारी (ता. ६) ४४ अंशांनी वधारून २६,३९२.७६ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही १४ अंशांची वाढ होऊन तो ८१४३.१५ वर बंद झाला.

पतधोरणाच्या बैठकीत व्याजदर कपातीची शक्यता व्यक्त केली जात आहे. सकाळपासून व्याजदरांशी संबंधित शेअर्स खरेदीवर गुंतवणूकदारांनी भर दिला. देशात जुन्या नोटा जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यातून बँकांकडे भरघोस रक्कम जमा झाली आहे. बाजारात रोखतेचे प्रमाण वाढल्याने पतधोरण आणखी शिथिल होईल, असा अंदाज जाणकारांकडून व्यक्त केला जात आहे. चलन बाजारात डॉलरसमोर रुपया ३१ पैशांनी वधारल्यानेही गुंतवणूकदारांना हुरूप आला. सेन्सेक्समधील ३० पैकी १८ शेअर तेजीसह बंद झाले. यात एचडीएफसी, टाटा स्टील, ओएनजीसी, अदानी पोर्ट यांच्या शेअर्सच्या किमती वधारल्या. तेल आणि नैसर्गिक वायू, रियल्टी क्षेत्रातील निर्देशांकांत वाढ झाली. काही शेअर्समध्ये नफेखोरी झाल्याने सेन्सेक्सच्या घोडदौडीला काहीसा लगाम लागला. आशियातील बहुतांश बाजारांत तेजीचे वातावरण होते. अमेरिकेतील बाजारांतील तेजीचा आशियाई बाजारावर सकारात्मक परिणाम झाला.

तोट्यातल्या उद्योगांतील गुंतवणुकीने 'टाटा'ला धोका

पदच्युत अध्यक्ष सायरस मिस्त्री भूमिकेवर ठाम

टाटा-मिस्त्री वाद

मुंबई, ता. ६ (पीटीआय) : टाटा समूहाने युरोपातील तोट्यात असलेल्या उद्योगांत केलेली गुंतवणूक समूहाला संकटात आणू शकते, असे सांगत 'टाटा सन्स'चे पदच्युत अध्यक्ष सायरस मिस्त्री यांनी आपल्या निर्णयांबाबत ठाम भूमिका घेतली आहे. याचसोबत टाटा समूह युरोपातील गुंतवणुकीकडे अल्पकालीन आर्थिक चष्म्यातून पाहत असल्याचेही मिस्त्रींचे म्हणणे आहे.

मिस्त्री यांना टाटा स्टीलच्या अध्यक्षपदावरून हटवण्याचा टाटा विश्वस्त मंडळाचा विचार आहे. या पार्श्वभूमीवर मिस्त्रींनी आपल्या बचावासाठी 'भूमिका स्पष्ट केली. मिस्त्री यांची याआधीच टाटा समूहाच्या विविध कंपन्यांच्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी करण्यात आलेली आहे. मिस्त्रींनी ब्रिटनमधील गुंतवणुकीला तात्पुरत्या फायद्याच्या दृष्टिकोनातून पाहिल्याच्या आरोपाचे खंडन करतानाच टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून केलेली हकालपट्टी बेकायदा असल्याचा पुनरुच्चार केला.

मिस्त्री यांनी सोमवारी आगामी सर्वसाधारण सभेत टाटा सन्समधील नुस्ली वाडिया यांच्या हकालपट्टीच्या ठरावाविरोधात मतदान करण्याचे आवाहन समभागधारकांना केले होते. तात्पुरत्या फायद्यातून युरोपातील उद्योगांत गुंतवणूक होत असल्याचा आडाखा बांधला जात आहे. हे सत्य नाही, असेही मिस्त्री यांनी नमूद केले आहे. 'टाटा'च्या युरोपातील पोलाद उद्योगाची वाढ ९३ हजार ५०० कोटींवर पोहचल्याचा दावा मिस्त्री यांनी केला आहे.

नोटाबंदीचा रशियाकडून निषेध

आर्थिक कामकाज विभागाकडून निर्णय नाही

गेल्या आठवड्यात परराष्ट्र मंत्रालयाने आर्थिक कामकाज विभागाकडे तीन ते चार विनंत्या केल्या आहेत. यात नोटाबंदीनंतर दूतावासांना पुरेशा पैशाचा पुरवठा करण्याच्या विनंतीचा समावेश होता. यावर अद्याप आर्थिक कामकाज विभागाने निर्णय घेतलेला नाही.

नवी दिल्ली, ता. ६ (पीटीआय) : नोटाबंदीमुळे निर्माण झालेल्या रोकड टंचाईचा फटका रशियाच्या दूतावासाच्या कामकाजावर होत असून, याचा रशियाने कठोर शब्दांत निषेध केला आहे. यावर तातडीने तोडगा न काढल्यास मॉस्कोतील भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित करण्याचा पर्याय वापरण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

भारतातील रशियाचे राजदूत अलेक्झांडर कदाकिन यांनी याविषयी परराष्ट्र मंत्रालयाला पत्र पाठविले आहे. पैसे काढण्यावरील मर्यादेमुळे दूतावासाचे दैनंदिन कामकाज विस्कळित झाले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने यात हस्तक्षेप करून राजनैतिक अधिकाऱ्यांना पैसे काढण्याची मर्यादा शिथिल करावी, अशी मागणी पत्रात केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने अद्याप पत्राचे उत्तर दिले नसून, लवकरच हा प्रश्न सुटेल, अशी आशा आहे. हा प्रश्न न सुटल्यास अन्य पर्यायांचा विचार करावा लागेल आणि यात मॉस्कोतील वरिष्ठ भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित करण्यात येईल, अशी माहिती रशियाच्या दूतावासातील अधिकाऱ्यांनी दिली.

पोलाद प्रकल्प सुरूच राहणार?

लंडन, ता. ६ (पीटीआय) : ब्रिटनमधील सर्वांत मोठा पोलाद प्रकल्प थायसन क्रूप पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याचे 'टाटा स्टील'चे प्रयत्न आहेत. जर्मनीसोबत भागीदारीत असलेला हा प्रकल्प बंद पडल्यामुळे चार हजारांच्या वर कामगारांचा रोजगार बुडाला होता.

'द टाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, टाटा समूह थायसन क्रूप प्रकल्प सुरूच ठेवणार आहे. १० वर्षांपर्यंत येथील कर्मचारी या प्रकल्पात काम करणार आहेत. टाटा स्टीलने जाहीर केलेल्या निवेदनात ब्रिटनमधील व्यवसायाविषयी टाटा समूह सकारात्मक विचार करत असल्याचे सांगण्यात आले. विविध उद्योग समूहांसोबत केलेल्या चर्चेनंतर ब्रिटनमधील प्रकल्प सुरू करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

घरकामगारांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणणार

मुंबई, ता. ६ : असंघटित क्षेत्रात मोठ्या संख्येने असलेल्या घरकाम करणाऱ्या कामगारांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न पुण्यातील SERV'D या कंपनीने केला आहे. अँण्ड्रॉईड व आयओएसवर SERV'D हे ॲप डाऊनलोड करून, त्यावर मालकांना नोंदणी करता येईल.

स्वयंपाकी, आया, वाहनचालक यांची माहिती या ॲपवरील फॉर्ममध्ये भरता येईल. या ॲपवर कामगारांची हजेरी, सुट्या, मानधन या बाबींची नोंद ठेवली जात असून, कामगारांना मानधन देणे सोपे होणार आहे. SERV'D वर पैसे हस्तांतराचीही सुविधा असल्याने मालकांना डेबिट/क्रेडिट कार्ड व नेट बँकिंगमधून कामगारांना पैसे देणे शक्य होईल.

या ॲपद्वारे घरकाम करणाऱ्या कामगारांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्यास मदत होईल, असे SERV'D चे सहसंस्थापक जतीन अग्रवाल यांनी सांगितले. त्यामुळे कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन मिळेल आणि कामगारांचा आर्थिक रेकॉर्डही तयार होईल; जो त्यांची पुढील आर्थिक गरज भागण्यासाठी बँकांच्या कामी येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डीआयएल लिमिटेड
Corporate Identification Number : L99999MH1951PLC008485
नोंदणीकृत कार्यालय : डीआयएल कॉम्प्लेक्स, घोडबंदर रोड, माजिवाडा, ठाणे (पश्चिम) - ४०० ६१०. महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ - २२ - ६७१८ ०८०० / 888 फॅक्स : +९१ - २२ - ६७१८ ०८९९
ई-मेल : contact@dil.net I वेबसाईट : www.dil.net

समभागधारकांसाठी सूचना

कंपनीच्या बाबीच्या मंत्रालयाने सूचित केलेल्या इन्व्हेस्टर एजुकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड ऑथोरेटी (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर अँण्ड रिफंड) रूल्स २०१६ (दि रूल्स) बरोबर वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा कलम २०१३ च्या तरतुदीनुसार सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ ज्या समभागांसाठी भागधारकांनी लाभांशावर दावा केलेला नसेल, असे समभाग कंपनीकडून इन्व्हेस्टर एजुकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड (आय इ पी एफ) सस्पेन्स अकाऊंट मध्ये हस्तांतरीत करण्यात येतील.

ज्यांच्या समभागांचे हस्तांतरण आय इ पी एफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये होणार आहे, अशा भागधारकांकडून या बाबत योग्य ती कार्यवाई सुरू करण्यात यावी, यासाठी कंपनीने या रूल्सच्या अनुसार संबंधित भागधारकांबरोबर स्वतंत्रपणे पत्रव्यवहार (संपर्क) केलेला आहे. कंपनीने अशा प्रकारचे भागधारक व समभाग यांचे तपशील आपल्या वेबसाइट www.dil.net वर अपलोड केले आहेत. अशाप्रकारचे समभाग आय इ पी एफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये हस्तांतरीत होऊ नयेत, यासाठी वित्तीय वर्ष २००८-०९ पासूनच्या बाटप न झालेल्या लाभांशावर दावा करण्यासाठी सदर भागधारकांनी कंपनी आणि/किंवा तिचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स, लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि. (आर अँण्ड टी एजंट्स) यांच्याकडे २६ डिसेंबर, २०१६ च्या आत अर्ज करावा, अशी सूचना संबंधित भागधारकांना देण्यात येत आहे. या गोष्टीची नोंद घेण्यात यावी कि कंपनी किंवा रजिस्ट्रार यांच्याकडे २६ डिसेंबर, २०१६ पर्यंत कोणताही दावा अथवा पत्रव्यवहार मिळाला नाही, तर पुढे कोणतीही सूचना न देता रूल्समधील तरतुदींच्या अनुसार कंपनी पुढे वर्णन केलेल्या समभागांचे आय इ पी एफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये पुढीलप्रमाणे हस्तांतरण करील,

i) छापील स्वरूपात धारण असलेले समभाग - डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्रांचे सादरीकरण व त्यानंतर त्यांचे आय इ पी एफ मध्ये हस्तांतरण करून ;

ii) डिमटेरियलाइज्ड स्वरूपात धारण असलेले समभाग समभागांचे सेट आय इ पी एफच्या डिमटेरियलायझेशन अकाऊंटमध्ये हस्तांतरण करून

भागधारकांनी या गोष्टीची नोंद घ्यावी की अशा समभागांवर जर काही लाभ जमा झाले असतील तर, त्याराठ आय ई पी एफ/आय ई पी एफ सस्पेन्स अकाऊंट मध्ये हस्तांतरीत झालेले समभाग आणि दावा करण्यात न आलेला लाभांश, या दोन्हींच्या बाबत, रूल्समध्ये वर्णन केलेल्या कार्यपद्धतीनुसार आय ई पी एफ ऑथोरिटीकडे सादर समभागांसाठी दावा सादर करता येऊ शकेल.

संबंधित विषयावर भागधारकांना कोणताही प्रकारच्या शंका असतील तर त्यानी सी-१३, पन्नालाल सिल्क मिल्स कंपाऊंड, भांडुप (पश्चिम), मुंबई - ४०० ०७८, दूरध्वनी : ०२२ - २५९४६९७०, ई मेल: iepf.shares@linkintime.co.in या पत्त्यावरील कंपनीच्या आर अँण्ड टी एजंट्स बरोबर संपर्क साधावा.

डीआयएल लिमिटेड करिता
श्रीकांत एन. शर्मा
उपाध्यक्ष (लिगल) आणि कंपनी सचिव

तारीख : ०५ डिसेंबर, २०१६
स्थळ : ठाणे

DIL / 67 / PREM ASSOCIATES - MAR

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
स्थापत्य विभाग
ई-निविदा सूचना क्र - स्थापत्य/मुख्यालय/HO/71/2/2016-2017
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमुद केलेल्या कामांसाठी ई टेंडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.

अनु. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम	बयाणा रक्कम	अनामत रक्कम	कामाची मुदत (महिने)	निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी)
१	मुंबई-पुणे सरपास दापोडी येथे सब-वे बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे	८७९७२८१३	८७९७३०	३५८९२०	१०	१५१००
२	सांगवी-किवळे रस्ता काकेडीकर येथे सब-वे बांधणे.	५८५९२१६०	५८५९३०	२३४३६९०	१०	१५१००

वरील कामांसाठीचा तपशील उदा. बयाणा,अनामत रक्कम, निविदाच्या अटी, शर्ती, निविदा रोडयूल बी. इ. माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा फक्त ई-टेंडरिंग पद्धतीने मनपाच्या वेबसाईटवरून निविदा भरावयाची आहे. सदरची ई-टेंडरिंग प्रक्रियेअंतर्गत निविदा दि. २१-१२-२०१६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई-टेंडरिंग पद्धतीने वेबसाईटवरच भरता येतील. निविदाधारकांनी निविदेची फॉर्म फी, बयाणा रक्कम मनपा पेमेंट गेट वे सिस्टिमद्वारे भरावयाची आहे. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. सदरची निविदा www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जाहीरात क्र. २५३
का.क्र. : स्था/लेखा/१/कावि/१३६२/१६,
दिनांक : ०६/१२/२०१६
निविदापूर्वक सभा: १४/१२/२०१६ दुपारी ३ वाजता

सही /-
सह शहर अभियंता
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८

NOTICE kotak Mutual Fund

Declaration of Dividend under Monthly Dividend Option of Kotak Equity Savings Fund

Notice is hereby given that Kotak Mahindra Trustee Company Limited; the Trustee to Kotak Mahindra Mutual Fund has approved dividend as per the details given below under the Monthly Dividend Option of Kotak Equity Savings Fund, an open ended equity scheme.

Name of Scheme	Record Date	Face Value per unit	Quantum of dividend per unit #	NAVs as on December 05, 2016
Kotak Equity Savings Fund – Regular Plan – Monthly Dividend Option	December 12, 2016	Rs. 10.00	Re. 0.05	10.5601
Kotak Equity Savings Fund – Direct Plan – Monthly Dividend Option			Re. 0.055	10.7016

Distribution of the above dividend is subject to the availability and adequacy of distributable surplus..

Pursuant to payment of dividend, the NAVs of the Dividend Option of the Scheme would fall to the extent of payout and statutory levy if any.

All Unit Holders / Beneficial Owners of the Dividend Options of the scheme, whose names appear in the records of the Registrar, Computer Age Management Services Pvt. Ltd. / Depositories as on December 12, 2016, will be eligible to receive the dividend.

For Kotak Mahindra Asset Management Company Limited
Investment Manager – Kotak Mahindra Mutual Fund
Sd/-
Nilesh Shah
Managing Director

Mumbai
December 06, 2016

Any queries / clarifications in this regard may be addressed to:
Kotak Mahindra Asset Management Company Limited
CIN: U65991MH1994PLC080009
(Investment Manager for Kotak Mahindra Mutual Fund)
6th Floor, Kotak Towers, Building No. 21, Infinity Park, Off: Western Express Highway, Goregaon - Mulund Link Road, Malad (East), Mumbai 400097.
Phone Number: 66056825 • Email: mutual@kotak.com • Website: assetmanagement.kotak.com

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

नवी मुंबई महानगरपालिका

• जाहीर प्रकटन •

स्वच्छ भारत मिशन व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ विभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. 80 तसेच बेलापुर विभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. 101 व 103 हागणदारी मुक्त जाहीर करण्यात येणार आहे. हागणदारी मुक्त प्रभाग म्हणजे, दिवसाच्या कोणत्याही वेळी कोणतीही व्यक्ति उघड्यावर शौचास बसलेली न आढळणे. या अनुषंगाने संबंधित विभाग कार्यालयाच्या हद्दीमध्ये आवश्यक तेथे वैयक्तिक, सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

तरी, नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वरील सर्व प्रभाग हागणदारी मुक्त जाहीर करणे बाबत आपली काही हरकत असल्यास संबंधित विभाग कार्यालय येथे सहाय्यक आयुक्त / विभाग अधिकारी यांचेकडे किंवा नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर हे प्रकटन जाहीर झाल्यापासून 15 दिवसात लेखी स्वरूपात नोंदवावी, ही विनंती.

सही /-
(अंकुश पव्हाण)
अतिरिक्त आयुक्त (शहर)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक-नमुंमपाज संजाहिरात/575/2016

आयएचपी फिनवेस्ट लिमिटेड
सीआयएन : U65920MH1996PLC103184
नोंदणीकृत कार्यालय : कन्स्ट्रक्शन हाऊस, २ रा मजला, वालचंद हिराचंद रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१. दू. : +९१-२२-२२६१८०९१/४०७४८१८१.
फॅक्स : +९१-२२-२२६५६८६३ ई-मेल : ihpfinvest@yahoo.co.in

सूचना

(कंपनीच्या समभागधारकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी) विषय : गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आईपीईएफ) सस्पेन्स अकाऊंटमध्ये कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण

प्रशासकीय कामकाज मंत्रालयाने दि. ७ सप्टेंबर, २०१६ पासून अधिसूचित केलेल्या गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकारी (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण व परतावा) नियम, २०१६ (नियम) च्या तरतुदींअंतर्गत सूचना यापूर्वी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर नियमामध्ये, सलगोपाठ सात वर्षे वा त्याहून अधिक कालावधीकरिता लाभांश प्रदानित करण्यात आलेले नाही वा भागधारकांद्वारे दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व शेअर्सचे हस्तांतरण गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आईपीईएफ) सस्पेन्स खात्यामध्ये हस्तांतरित करण्याकरिताच्या तरतुदी अन्य प्रकरणांसमवेत अंतर्भूत आहेत.

नियमामध्ये विहित विविध आवश्यकतानुसार, सदर नियमांतर्गत योग्य ती कार्यवाई करण्यासाठी ज्या भागधारकांचे शेअर्स आईपीईएफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये हस्तांतरित करावयाचे आहेत, त्या संबंधित भागधारकांना कंपनीने व्यक्तिगत स्वरूपात कळविलेले आहे.

भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की, दोन्ही दावा न केलेले लाभांश व आईपीईएफ प्राधिकारी/सस्पेन्स अकाऊंटमध्ये हस्तांतरित केलेले शेअर्स अशा शेअर्सवर उद्भवणारे सर्व लाभ, काही असल्यास, त्यांच्यासमवेत यांकरिता आईपीईएफ प्राधिकाऱ्यांकडे नियमांद्वारे विहित प्रक्रियेचे पालन करून दावा करता येऊ शकेल.

प्रत्यक्ष स्वरूपात भागधारक असलेले व ज्यांचे शेअर्स आईपीईएफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये हस्तांतरित करण्यात येणार आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की, नियमांनुसार आईपीईएफ सस्पेन्स अकाऊंटकडे शेअर्सच्या हस्तांतरणाकरिता त्यांच्याद्वारे धारण मूळ शेअर प्रमाणपत्रांच्या बदल्यात कंपनी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे वितरित करील व अशा वितरणपश्चात मूळ शेअर प्रमाणपत्रे ज्यामध्ये त्यांची नावे नोंद असतील, ती आपोआप रद्द ठरतील व ती पुन्हा उपयोगात आणण्यायोग्य नसतील.

दि. २६ डिसेंबर, २०१६ पर्यंत किंवा अधिकाऱ्यांद्वारे विस्तारित अशा अन्य तारखेपर्यंत कंपनीला संबंधित भागधारकांकडून कोणताही पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यास कंपनी नियत तारखेपर्यंत नियमांतर्गत विहित आवश्यकतांची पूर्तता करून नियमांतर्गत विहित प्रक्रियेप्रमाणे आयईपीएफ सस्पेन्स अकाऊंटमध्ये शेअर्सचे हस्तांतरण करील.

सदर प्रकरणी व नियमांतर्गत भागधारकांना काही शंका असल्यास ते कंपनीशी तिचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता कन्स्ट्रक्शन हाऊस, २ रा मजला, ५, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१, दू. क्र. : +९१-०२२-२२६१८०९१/४०७४८१८१, फॅक्स क्र. : +९१-०२२-२२६५६८६३, ई-मेल : ihpfinvest@yahoo.co.in येथे संपर्क साधू शकतील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ५ डिसेंबर, २०१६
आयएचपी फिनवेस्ट लिमिटेडकरिता
राजस आर. दोशी
संचालक